प्रेस नोट

लातूर जिल्हा चालक पोलीस शिपाई भरती-२०२४-२५

दिनांक ०७.०३.२०२६

लातूर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील जाहिराती मध्ये नमुद केल्या प्रमाणे प्रवर्गनिहाय (१६) रिक्त पदांची चालक पोलीस शिपाई भरती २०२४-२५ ची पहिल्या टप्यात "शारिरिक मोजमाप व शारिरिक चाचणी" प्रक्रिया दिनांक १४.०२.२०२६ ते दिनांक २३.०२.२०२६ या कालावधीमध्ये पुर्ण झालेली आहे.

दुसऱ्या टप्यात लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची **"वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी"** प्रक्रियाकरिता **१:१५ या प्रमाणे एकूण ४९८ उमेदवारांची** दिनांक ०४.०३.२०२६ रोजीपासून सकाळी ०५.०० वा. पासुन पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर येथील मैदानावरती घेण्यात येणार असुन "वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी" करीता त्यांना देण्यात आलेल्या तारखेला उपस्थित राहण्यासाठी उमेदवारांच्या भ्रमणध्वनीवर एस.एम.एस तसेच कॉल करुन व त्यांच्या ई-मेलव्दारे हजर राहणेबाबत समज देण्यात आलेली आहे.

"वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी" ही खालील प्रमाणे द्यावी लागेल. सदर दोन्ही चाचण्यांमध्ये उमेदवारांना एकत्रित किमान ४० टक्के गुण मिळवुन उत्तीर्ण व्हावे लागेल.

अ) हलके मोटार वाहन चालविण्याची चाचणी — **२५ गुण**

ब) जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी — **२५ गुण**

आज दिनांक ०७.०३.२०२६ रोजी " **वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी** " करीता **बोलविण्यात आलेले (११४) उमेदवारांपैकी (९७)** उमेदवार उपस्थित असून उर्वरीत (१७) उमेदवार हे गैरहजर राहिले आहेत. तसेच दिनांक ०४.०३.२०२६ ते ०६.०३.२०२६ या कालावधीमध्ये गैरहजर/अनुपस्थित **उमेदवारांपैकी (१७) उमेदवार** हे आज रोजी वाहन कौशल्य चाचणीकरिता उपस्थित आलेले आहेत.

पोलीस भरती प्रक्रियेस हजर असलेल्या दिनांक ०७.०३.२०२६ रोजी "वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी" करीता हजर आलेल्या (११४) उमेदवारांची चाचणी घेण्यात आली असता (८८) उमेदवार हे सदर चाचणीमध्ये पात्र झाले असुन, (२६) उमेदवार अपात्र झाले आहेत. सदर कौशल्य चाचणीमध्ये उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी या कार्यालयाचे संकेतस्थळ www.laturpolice.gov.in वरती व पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथील दर्शनी भागावरील ठिकाणी डकविण्यात आलेली आहे. सदर प्रमाणे प्रसिद्ध करण्यात आलेल्या गुणांचे यादीबाबत उमेदवारांचा काही आक्षेप असल्यास त्यांनी (४८) तासामध्ये लेखी आक्षेप या कार्यालयाचे ई-मेल आयडी sp.latur@mahapolice.gov.in यावरती नोंदविण्यात यावा यानंतर प्राप्त होणारे आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

लातूर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील चालक पोलीस शिपाई भरती सन २०२४-२०२५ मधील उमेदवारांची वाहन कौशल्य चाचणी दि.०४.०३.२०२६ ते दि.०७.०३.२०२६ या कालावधीत पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर या ठिकाणी घेण्यात आली असून वाहन कौशल्य चाचणीकरिता बोलविण्यात आलेले उमेदवार यांचे हजर/गैरहजर व कौशल्य चाचणीत पात्र/अपात्र ठरलेल्या उमेदवारांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

:: लातूर जिल्हा चालक "वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी " प्रक्रियाचा एकत्रित गोषवारा ::

पद	"वाहन कौशल्य चाचणीस " बोलाविण्यात आलेले एकूण उमेदवार	प्रत्यक्षात हजर झालेले एकूण उमेदवार	"वाहन कौशल्य चाचणी " गैरहजर उमेदवार	"वाहन कौशल्य चाचणीत " पात्र एकूण उमेदवारांची संख्या			"वाहन कौशल्य चाचणीत " अपात्र एकूण उमेदवारांची संख्या		
				पुरुष	महिला	पात्र एकूण	पुरुष	महिला	अपात्र एकूण
२	३	४	५	६			७		
चालक पोलीस शिपाई	४९८	४४९	४९	३०८	२७	३३५	४७	६७	११४

दि.०४.०३.२०२६ रोजी पासून पोलीस मुख्यालय,बाभळगाव लातूर येथे सुरु असलेली लातूर जिल्हा चालक पोलीस शिपाई यांची **"वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी " प्रकिया आज दि.०७.०३.२०२६ रोजी पुर्ण झाली आहे .**

अमोल श्री ताव (भापोसे)
पोलीस अधीक्षक, लातूर